१

# नको देवराया अंत आता पाहू

संत कान्होपात्रा

*परिचय – संत कान्होपात्रा (पंधरावे शतक), वारकरी संप्रदायातील संतकवयित्री. पंढरपूरजवळील मंगळवेढे येथील शामा नावाच्या गणिकेची कन्या. ती मोठी झाल्यानंतर गणिकेचे जगणे नाकारून तिने पांडुरंगाच्या भक्तीला वाहून घेतले. विठ्ठलभक्तीची ओढ; त्यामुळे विठ्ठलाच्या चरणी तनमन वाहून टाकले. व्रतस्थ आणि उज्ज्वल व्यक्तिमत्त्वाचे दर्शन त्यांच्या काव्यातून घडते. त्यांचे सुमारे २६ अभंग उपलब्ध आहेत.*

*कान्होपात्रेने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल विठ्ठलास साकडे घातले आहे. आणि त्यातून आपल्या अंतःकरणातील व्याकूळता मांडली आहे.*

●●●

नको देवराया, अंत पाहूं आता ।
प्राण हा सर्वथा फुटों पाहें ।।१।।

हरिणीचे पाडस व्याघ्रें धरियेलें ।
मजलागीं जाहले तैसें देवा ।।२।।

तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी ।
धांवे वो जननी विठाबाई ।।३।।

मोकलोनी आस जाहले मी उदास।
घेई कान्होपात्रेस हृदयांत ।।४।।



Scanned with OKEN Scanner

२

# बाई मी लिहिणें शिकलें सद्‌गुरायापासीं

संत जनाबाई

परिचय – संत जनाबाई (समाधी १३५०), वारकरी संप्रदायातील एक महत्त्वाच्या संतकवयित्री. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड हे मूळ गाव. दमा-कुरुंड ह्या दांपत्याची ती मुलगी. कोवळ्या वयात ती पोरकी झाली. वयाच्या सहाव्या – सातव्या वर्षी ती संत नामदेवांच्या घरात आली. नामदेवांच्या कुटुंबात ती वाढली, मोठी झाली. आईबापाविना चुकलेले हे लेकरू विठ्ठल-रुक्मामाईलाच आई-वडील मानून राहते. नामदेवाच्या कुटुंबातील एक आप्त म्हणून जनाबाई पंढरपुरात राहिल्या. संत नामदेवांमुळे त्यांना विठ्ठलभक्तीची गोडी लागली. 'नामयाची दासी' असे ती स्वतःला म्हणवून घेते. भक्तिरंगी रंगलेल्या नामदेवांचा नित्य सहवास तिला लाभला. घरकामे करताना ती अभंग गाऊ लागली.

जनाबाईंनी विपुल काव्यरचना केली; परंतु आज त्यांच्या नावावर फक्त ३५० अभंग आढळतात. 'कृष्णजन्म', 'प्रल्हादचरित्र', 'द्रौपदीस्वयंवर', 'हरिश्चंद्राख्यान' ही आख्याने जनाबाईंनी रचली असे समजले जाते.

विठ्ठलभक्तीची उत्कट आर्तता, भावविवशता, व्याकूळता, लीनता, उत्स्फूर्तता इत्यादी त्यांच्या अभंगलेखनाची वैशिष्ट्ये होत.

सगळ्या विश्वाच्या पलीकडची निर्गुणाची अवस्था कशी आहे. सर्व विश्वामध्ये एक तत्त्व आहे, ते तत्त्व म्हणजेच निर्गुणाचाच सगुण आकार होय. हा आशय या अभंगातून अधोरेखित होतो.

•••

बाई मी लिहिणें शिकलें सद्‌गुरायापासीं ।। धृ.।।

ब्रह्मीं झाला जो उल्लेख । तोचि नादाकार देख ।।<br>
पुढें ओंकाराची रेख । तुर्या म्हणावें तिसी ।। १ ।।

माया महतत्त्वाचें सुभर । तीन पांचाचा प्रकार ।।
पुढें पंचविसांचा भार । गणती केली छत्तीसीं ।। २ ।।

बारा सोळा एकविस हजार । आणिक सहाशांचा उबार ।।
माप चाले सोहंकार । ओळखिले बावन्न मात्रेंसी ।। ३ ।।

चार खोल्या चार घरीं । चौघे पुरुष चार नारी ।।
ओळखुनी सर्वांशीं अंतरीं । राहिले पांचव्यापासीं ।। ४ ।।

पांच शहाणें पांच मूर्खं । पांच चाळक असती देख ।।
पांच दरोडेखोर आणिक । ओळखिलें दोघांसी ।। ५ ।।

एक बीजाचा अंकूर । होय वृशांसी विस्तार ।।
शाखापत्रें फळ फुलभार । बीजापोटीं सामावे ।। ६ ।।

कांतीण तंतूशी काढून । वरी क्रीडा करिती जाण ।।
शेवटी तंतूशी गिळून । एकटी राहे आपैसी ।। ७ ।।

वेदशास्त्र आणि पुराणा । याचा अर्थ आणितां मना ।।
कनकीं नगाच्या भूषणा । अनुभव वाटे जीवासीं ।। ८ ।।

नामदेवाच्या प्रतापांत । शिरीं विठोबाचा हात ।।
जनी म्हणे केली मात । पुसा ज्ञानेश्वरासी ।। ९ ।।

*(जनाईचे अभंग)*



Scanned with OKEN Scanner

३

# कुठे दबा धरून बसले आहे तुफान

प्रा. विलास वैद्य

*परिचय* – *प्रा. विलास तातेराव वैद्य (जन्म १९५६), हिंगोली येथील आदर्श महाविद्यालयातून मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून सेवानिवृत्त. १९९० नंतरच्या पिढीतील महत्त्वाचे कवी. जागतिकीकरणानंतर सुरू झालेल्या भांडवलशाहीच्या आविष्कारातून आपल्या देशात एक नवा प्रयोग सुरू झालेला आहे. याची दाहक वास्तवता त्यांच्या लेखनात दिसून येते. त्यामुळे त्यांची कविता वाचकांना अंतर्मुख करते. नवे भान देते.*

*'गलफ', 'आलाप', 'माझ्या प्रयोगशील देशात', इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध. 'बारा एकांकिका' या एकांकिका संग्रहाचे संपादन. मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळीतील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ. एस.आर. रंगनाथन पुरस्कार, राज्यस्तरीय श्री.कोशिराज व्यास ग्रंथमित्र पुरस्कारासह इतरही मान्यवर संस्थांचे अनेक पुरस्कार प्राप्त. आत्मशोध, सामाजिक जाणीव आणि साधी सरळ रचना ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये. 'कुठे दबा धरून बसले आहे तुफान' या कविता संग्रहातून ही कविता निवडली आहे.*

*माणसं स्वतःच्या स्वार्थासाठी परस्परातील बंधुत्त्व धोक्यात आणीत आहेत. या प्रदूषणाला नष्ट करण्यासाठी आजची तरुण पिढी पुढे सरसावली आहे, सोबतीला एका वेगवान तुफानाची वाट पाहत आहेत असा आशय या कवितेतून व्यक्त झाला आहे.*

●●●

तडा गेलेला स्पष्ट दिसत असताना
माणसांच्या मना-मनाला...
तरीही केवढ्या भरजरी वेशभूषेत
लोक जमा होत आहेत समारंभाला...
हा कसला आदेश, हे कसले फर्मान
क्षणार्धात... टाळ्यांच्या कडकडाटात



Scanned with OKEN Scanner

जाळून टाकल्या जात आहे
परस्परातील बंधुभाव
सभा जिंकल्याच्या आनंदात
फेटे बांधून
निघाले आहेत हे लोक
आपापल्या मुक्कामाला
घरी मुले बिचारी !
केवढे कष्टी, केवढे उदास
बापाने लुटून आणलेले पाहून सन्मान
ते झेपावत आहेत रस्त्यावर...
होत आहेत पुन्हा पुन्हा हैराण
कुठे दबा धरून बसले आहे तुफान...

*(माझ्या प्रयोगशील देशात)*



Scanned with OKEN Scanner

४

# सरावन महिना आला की

प्रा. रविचंद्र हडसनकर

परिचय – प्रा. रविचंद्र हडसनकर (जन्म १९४७), मराठवाड्यातील महत्त्वाचे कवी आहेत. त्यांचे 'ठिणगी' (१९७७), 'देणगी' (१९८३), 'अरे मानसा मानसा', 'हळद उन्हे' इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. आंबेडकरवादी आणि ग्रामीण जीवनातील बदलत्या परिस्थितीचे चित्रण करणारे कवी. कथाकार, गीतकार. 'अस्मितादर्श' या पुरस्काराने सन्मानित.

'दावन', 'मृत्यूपर्व' हे कथासंग्रह प्रकाशित. 'गीत नवे तेज नवे' हा गीतसंग्रह. त्यांच्या काव्यसंग्रहात एका वेगळ्या प्रकारच्या वाट्याला आलेल्या सामाजिक वेदनेचे दुःख घेऊन कविता साकार झाल्या आहेत.

अठराविश्व दारिद्र्याची अतिव जाणीव, भुकेची तिव्रता आणि भूक किती वेदनामय असते. शेवटी स्वप्नभंग कसा होतो, याचे आर्त चित्रण कवीने प्रस्तुत कवितेतून व्यक्त केली आहे.

●●●

सरावन महिना आला की,
असाच जीव भंडावून जाते
आभाळ फाटल्यावानी सांडू लागलं की
आपली झोपडी पुळू पुळू लडू लागते...

आपली माय मंजे केळीचा गाभा
पर घरात डझनभर केळाची फनी
गोधड्यावर आडवीतिडवी घोरत पडते....

त्यातच माय बोंबलते–
"आर बाब्या झोपू नको
तिकडं चुलीवर भगोनं ठेव"
तरी झोपडी लडू लागते टप....टप....



Scanned with OKEN Scanner

पुन्हा माय वरडते-
''आरं बाब्या उतरंडीजवळ परात ठेव''
तरी झोपडी लडू लागते टप....टप....टप....
मंग माय एकदम आडर सोडते.
''जात्याजवळ थाळ्या ठेव
भानोसाजवळ डेचकी ठेव
उखळाजवळ तांब्या ठेव
आड्याखाली बट्टू ठेव
धारनाच्या कोंट्यात पव्हऱ्या ठेव
दिव्याच्या देवळीकड काथोट ठेव''
इकडं तिकडं सम्दे बासनं सरतात
तरिय झोपडी लडूच लागते
टप....टप....टप....

मंग मायच्या तोंडून इस्तो पडते
''सागाच्या पानाचा मुडा, पाचट, पल्हाय्या
व्हरका काहानं इकत घेवाव गरीबायनं
येथं पोटाचीच राख व्हयना
त्यात घराकड कसं बघावं''

मायचा राग जरा सेंदळ व्हते
तवरिक मला जोरदार डुलकी लागते
अन् मायेच्या गोधडीत मला
पोटभर जेवल्याचं सपन पडते.

पुन्हा एक ठोक जोरात येते
झोपडी आपली मह्या अंगावरच लडू लागते.
आन् म्या डोळे उघडताच
पोटभर जेवल्याचं
सपन मात्र गाभडून जाते...

*(अरे माणसा माणसा)*



Scanned with OKEN Scanner

## ५

# माझ्या हाती नसती लेखणी

नागराज मंजुळे

**परिचय** – नागराज पोपटराव मंजुळे (जन्म १९७७), सोलापूर जिल्ह्यातील जेऊर या गावी त्यांचा जन्म झाला. एका छोट्याशा गावातून येऊन आपल्या लेखणी आणि दिग्दर्शन कौशल्याद्वारे मायानगरीत एक वेगळे अस्तित्त्व निर्माण करणारा कवी. सुरुवातीला पोलीस हवालदार, सिक्युरिटी गार्ड (चौकीदार), इस्त्रीवाला अशी कामे केली.

'पिस्तुल्या' या लघुपटास राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. 'फँड्री', 'नाळ' या चित्रपटानंतर 'सैराट' चित्रपटाने सर्व रेकॉर्डस् मोडून १०० कोटींच्या क्लबमध्ये नेऊन ठेवले. निर्माता, कलावंत आणि दिग्दर्शक म्हणून ओळख. कवी मनाचा हा लेखक, दिग्दर्शक एका विशिष्ट हेतूने कला क्षेत्रात उतरला आहे.

'उन्हाच्या कटाविरुद्ध' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. या कवितासंग्रहास 'भैरू रतन दमाणी' (२०११), 'नारायण सुर्वे काव्य प्रतिभा' (२०१४), आणि 'दया पवार स्मृति' (२०१४) पुरस्कार मिळाले आहेत.

अभिनव प्रतिमासृष्टी आणि विलक्षण शब्दकळा, कमीतकमी शब्दात अधिकाधिक आशयघन मांडणी समर्थपणे करण्यात ते यशस्वी झाले आहेत.

कविच्या मनात जे साठलय, त्यास वाट करून देण्याचा आदर्श मार्ग म्हणजे लेखणी. कविच्या मनात आत प्रचंड कोलाहल माजलाय. पण हा कोलाहल समाजाने लादलेला आहे. कविच्या भोवताली घडणाऱ्या घटनेने कवी अस्वस्थ आहे. आणि या घटनांचा, घटकांचा समाचार घेण्याचा, या विरुद्ध बंड पुकारण्याचा, विद्रोह करण्याचा मार्ग म्हणजेच लेखणी.

•••



Scanned with OKEN Scanner

५

# माझ्या हाती नसती लेखणी

नागराज मंजुळे

**परिचय** – नागराज पोपटराव मंजुळे (जन्म १९७७), सोलापूर जिल्ह्यातील जेऊर या गावी त्यांचा जन्म झाला. एका छोट्याशा गावातून येऊन आपल्या लेखणी आणि दिग्दर्शन कौशल्याद्वारे मायानगरीत एक वेगळे अस्तित्त्व निर्माण करणारा कवी. सुरुवातीला पोलीस हवालदार, सिक्युरिटी गार्ड (चौकीदार), इस्त्रीवाला अशी कामे केली.

'पिस्तुल्या' या लघुपटास राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. 'फँड्री', 'नाळ' या चित्रपटानंतर 'सैराट' चित्रपटाने सर्व रेकॉर्डस् मोडून १00 कोटींच्या क्लबमध्ये नेऊन ठेवले. निर्माता, कलावंत आणि दिग्दर्शक म्हणून ओळख. कवी मनाचा हा लेखक, दिग्दर्शक एका विशिष्ट हेतूने कला क्षेत्रात उतरला आहे.

'उन्हाच्या कटाविरुद्ध' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. या कवितासंग्रहास 'भैरू रतन दमाणी' (२०११), 'नारायण सुर्वे काव्य प्रतिभा' (२०१४), आणि 'दया पवार स्मृति' (२०१४) पुरस्कार मिळाले आहेत.

अभिनव प्रतिमासृष्टी आणि विलक्षण शब्दकळा, कमीतकमी शब्दात अधिकाधिक आशयघन मांडणी समर्थपणे करण्यात ते यशस्वी झाले आहेत.

कविच्या मनात जे साठलय, त्यास वाट करून देण्याचा आदर्श मार्ग म्हणजे लेखणी. कविच्या मनात आत प्रचंड कोलाहल माजलाय. पण हा कोलाहल समाजाने लादलेला आहे. कविच्या भोवताली घडणाऱ्या घटनेने कवी अस्वस्थ आहे. आणि या घटनांचा, घटकांचा समाचार घेण्याचा, या विरुद्ध बंड पुकारण्याचा, विद्रोह करण्याचा मार्ग म्हणजेच लेखणी.

•••



Scanned with OKEN Scanner

माझ्या हाती
नसती लेखणी
तर...
तर असती छिन्नी
सतार...बासरी
अथवा कुंचला

मी कशानेही
उपसतच राहिलो असतो
हा अतोनात कोलाहल मनातला

(उन्हाच्या कटाविरुद्ध)



Scanned with OKEN Scanner

६

# किनकीन घुंगराची

हनुमंत चांदगुडे

परिचय – हनुमंत चांदगुडे (जन्म १९७७), बारामती, जि. पुणे. प्रसिद्ध कवी व गीतकार, शेती, शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य माणूस आणि निसर्ग हे त्यांच्या लेखनाचे आवडते विषय. 'भेगा भुईच्या सांदताना' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. या काव्यसंग्रहास मराठी भाषा संवर्धन समितीच्या पुरस्कारासह आतापर्यंत अनेक पुरस्कारांनी गौरवलेला आहे... यामध्ये प्रामुख्याने गदिमा पुरस्कार, संत तुकाराम साहित्यरत्न पुरस्कार, राष्ट्रशाहीर अमर शेख राज्य पुरस्कार, चौथे छत्रपती शिवाजी महाराज राज्य पुरस्कार व इतर पुरस्कारांचा समावेश आहे. 'झाड व्हायचं दोघांनी' हा दीर्घ काव्यसंग्रह. अनेक मराठी चित्रपट, मालिका, अल्बम व वेबसिरीजसाठी गीतलेखन. 'मायलेकी' या मालिकेचे शीर्षकगीत, 'काकरी' हा स्वरचित कवितांचा अल्बम प्रकाशित. 'त्याचा काय नेम नाय' हे स्वरचित लोकगीत, 'आसवांचा झुला' हे प्रेमगीत प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत कवितेत लग्न होऊन सासरी असलेल्या बहिणीला माहेरी घेऊन येण्यासाठी तिचा लहान भाऊ मुऱ्हाळी म्हणून जातो. खूप दिवसांनी भाऊ आल्याचा आनंद तिला होतो, त्या आनंदात ते दोघे बैलगाडीने माहेरी येण्यासाठी निघतात, तेव्हा त्यांच्या मनातील भाव-भावनांचा जो गुंता आहे, तो अचानक घडलेल्या घटनांचा पट कवितेतून आला आहे.

•••

किनकीन घुंगराची, रुणझुण साद घाली
चाळ गळ्यातील बोले, गाडी सजवून झाली

भाऊ हुंकार टाकता, निघे भरधाव गाडी
वाघासारखी धावते, सर्जाराजाची गं जोडी

आला भाऊ गं मुऱ्हाळी, असा ताईला भेटला
किती आनंद ताईच्या, मनामधी गं साठला



Scanned with OKEN Scanner

ताई विचारी भावाला, कसे आहेत रे बाबा
बस पलंगी येऊन, दाद्या असा का रे उभा

काय करते रे आई, सांग दादूड्या तू मला
असं बोलत ताईने, तांब्या पाण्याचा गं दिला

काय बोलू काय नाही, असं ताईला झालेलं
जरी बोलते माझ्याशी, मन माहेरी गेलेलं

विचारते काही बाही, जे जे यायचं मनात
आता काय काय पीकं, केली आपल्या रानात

भाऊ सांगतो ताईला, शेती टाकली विकून
माझी सुटली गं शाळा, काय करावं शिकून

आई बाबाही थकले, आता कर्जाच्या भारानं
चल लगेच माहेरी, नको विचारू कारानं

झाली ताईची तयारी, तशी गाडीत बसली
गाडीमधी बसताना, हळू गालात हसली

गाडी निघाली धावत, पुढे पुढे धावे मनं
गाडीवान भाऊराया, गातो आनंदाने गाणं

आनंदाच्या भरामधी, नाही आलं त्याच्या ध्यानी
उटी लागली चाकाला, गेली सटकून कुनी

चाक गळून पडलं, भाऊ पडलाय खाली
तशी खरडत गाडी, त्याच्या अंगावर गेली

डोकं फुटलं भावाचं, वाहे रगताचा पूर
गाणं म्हणणारा भाऊ, असा झाला गपगार

हातपाय खोडताना, किती उरकली माती
भाऊ म्हणून ताईने, त्याला गोंजारले किती



Scanned with OKEN Scanner

ताई पाजतेय पाणी, भाऊ पाणीही पेईना
अशा वेळेस वाटेनी, वाटसरूही येईना

ताई मारतेय हाका, मदतीला कुणी धावा
भाऊ रक्ताच्या पुरात, त्याला उचलून घ्यावा

ताई किंकाळ्या मारते, भाऊ तरीही अबोल
झाला गपगार भाऊ, मंदावली हालचाल

ताई हलवते त्याला, भाऊ काहीतरी बोल
लई उशीर जाहला, ऊठ माहेराला चल

आलं मनात ताईच्या, नाडी तपासून पाही
तीला सापडेना शीर, कुठे धुकधूकी नाही

ताई समजून गेली, भाऊ देवाघरी गेला
आडरानात पाडस, शोधतया हरणीला

असा आघात ताईच्या, खोल मनावर झाला
आडरानात गलका, एका चिमणीने केला

कशी नियतीही आज, अशी हटून बसली
काय करावं कळेना, ताई रडत बसली

झाली बेभान ती ताई, काय करावं कळेना
सूदबूद ही हरली, जीभ तोंडात वळेना

असा किती वेळ गेला, नाही कुणालाच ठावा
ताई हासत उठली, खेळ सुरू झाला नवा

*(झाड व्हायचं दोघांनी)*



Scanned with OKEN Scanner

७

# विज्ञान वंदना

आ. य. पवार

*__परिचय__ – प्रा. आदिनाथ यशवंतराव पवार (जन्म १९४८), अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील 'बावी' या खेडेगावी शेतकरी कुटुंबात जन्म. ग्रामीण जीवनातील वास्तवाचे चित्रण करणारे लेखक, कवी म्हणून प्रसिद्ध. विविध वाङ्मयीन नियतकालिकांमधून कवितालेखन.*

*'रानमाती', 'सीनाकाठच्या कविता', 'ऊनपाऊस', 'धुळपेर', 'द्विदल' इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध. अनेक साहित्य संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे.*

*मराठीच्या अभ्यासकांनी व मान्यवर समीक्षकांनी त्यांच्या काव्यसंग्रहांवर विविध वाङ्मयीन नियतकालिकांतून समीक्षात्मक लेखन केले आहे. तसेच मुंबई दूरदर्शन, नागपूर व अहमदनगर आकाशवाणीवरून त्यांच्या कवितेवर भाष्य केले आहे. त्यांच्या कवितेवर 'रानगंध' आणि 'इंद्रधनू'हे दोन समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत.*

*प्रस्तुत कवितेतून बदलत्या विज्ञान-तंत्रज्ञानाचे वर्तमान व भविष्यातील मानवी जीवनावर होणारे परिणाम कवीने कल्पकतापूर्वक विज्ञान संकल्पनेतून मांडले आहे.*

●●●

जनुकीय तंत्रज्ञानाने वार्धक्यावर मात केली
दोन शतकं जगण्याची माणसाला हमी आली
पन्नाशीचे पोरपण सव्वाशीचे तरुणपण
ब्रह्माहाती हृदयगती नुरेल जगी आजारपण
दीर्घायुष्याचे आता नवे चार टप्पे होतील
पंखाळली माणसे भरारत नभी जातील
हायस्पिड ढगावरून
चांन्याचे सिग्नल दुरून
जखम लगेच बिल भरून



Scanned with OKEN Scanner

संगणकी महाजाल अनंताची लावी बोली
दोन शतकं जगण्याची माणसाला हमी आली
हुंडा-गिंडा बंद होईल नवी शर्त असेल खास
मंगळावर महिन्यासाठी बुक करा 'स्वप्न निवास'
नवरोबा हनिमुनला चंद्रावर नवरी नेतील
किती वेळा लग्ने नि किती घटस्फोट होतील!
बैलाला मुस्कं
महिलाला मास्क
पीक येईल वस्कं
एलियन्सच्या शोधासाठी ब्रह्मांडी याने गेली
दोन शतकं जगण्याची माणसाला हमी आली
विमाने नि रेलगाड्या सौरऊर्जा धावतील
विनाचालक बॅट्रीकार अचूक मार्ग दावतील
रोबो मागेल आरक्षण माणूस ठरेल कूचकामी
विधर्मी क्लोनिंगची वाणी निनादेल व्योमी
सिंधु शोधी पाणबुडी
अंतराळा यान सिडी
प्रगतीची झळके गुढी
गुंतागुंतीची नि अजोड रोबोटिक्ने कामे केली
दोन शतकं जगण्याची माणसाला हमी आली.

*(धूळपेर)*



Scanned with OKEN Scanner

८

# सांविधानिक मूल्ये

प्रा. शेषराव धांडे

**परिचय –** प्रा. शेषराव पिराजी धांडे (जन्म १९७०), १९९० नंतरच्या कालखंडातील उदयोन्मुख कवी म्हणून ओळखले जातात. वंचित, शोषित, बहुजन समाजाच्या व्यथा व वेदना मांडताना त्यांची लेखणी धारदार बनते. सामाजिक समता प्रस्थापित व्हावी, शोषणविरहित समाज निर्माण व्हावा व परिवर्तनाचा ध्यास ही त्यांच्या काव्यलेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

'विद्रोही', 'रस्ता सोडून चालला कुठे?', 'आमचा आलेख कोराच', 'बिघडलेले होकायंत्र' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांना 'अस्मितादर्श काव्य पुरस्कार', 'कुसुमाग्रज अंकुर साहित्य पुरस्कार', 'शंकरभाऊ साठे वाङ्मय पुरस्कार', 'शब्दांगण' पुरस्कार यासारख्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. 'बिघडलेले होकायंत्र'मधून ही कविता निवडलेली आहे.

भारतीय संविधानाने मानवतावादी मूल्यांना सर्वोच्च प्राधान्य दिले असले तरी, वास्तवात येथील बहुजन वर्गाला त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवले जाते. कारण विषमतावादी भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाहीमूल्ये अजूनही रुजली नाहीत. ही खंत व्यक्त करून ही मूल्ये रुजविण्यासाठी कवीची धडपड दिसून येते. हा आशय प्रस्तुत कवितेतून व्यक्त होतो.

•••

टँकरच्या जीवावर चालते आमची ठाकुरकी
मूलभूत गरजांपासून असतो वंचित
मातीमोल असलेलं आयुष्य
तग धरून जगतो आहे
पाण्याचे संदर्भ आठवले की,
अंगावर येतो काटा



Scanned with OKEN Scanner

चवदार तळ्याचे असू दे
किंवा असू दे रोहिणीतले.

दंगल नसते ठेवणीतल्या शब्दकोशातील ग्रंथासारखी
पेटली की निरपराध्याचाही जातो बळी

गाईच्या दुधाइतकी नसते चव पुडीच्या दुधाला
तरीही मागणीप्रमाणे होतो पुरवठा

कितीकही बदलू दे जीवनमान
जातवैभवावर टिकून आहे व्यवस्था
चष्म्याचे काच बदलून घेतल्याने बदलत नाही रूप
मानसिकतेचा पाया शाबूत आहे तोपर्यंत
धर्मग्रंथाची सत्ता चालूच राहील
भंगारमोल विकल्या जाईल आयुष्य
हे सर्व थांबवायचे असेल तर
संविधानाचे मूल्ये रुजले पाहिजे
प्रत्येकाच्या रक्तारक्तात.

*(बिघडलेले होकायंत्र)*



Scanned with OKEN Scanner